
जल जिवन मिशन अंतर्गत
बक्षिस वितरण


जिल्हा परिषद, वाशिम
जल जिवन मिशन अंतर्गत
आयोजीत जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, लघुपट स्पर्धेच्या विजेते स्पर्धकांचा
बक्षिस वितरण सोहळा
सन २०२३ – २४
मंगळवार दि. १२ मार्च २०२४ सकाळी ११ वाजता
स्थळ
सेलिब्रेशन लॉन, रिसोड
आयोजक
जिल्हा परिषद, वाशिम
हर घर जल
जल जीवन मिशन
जिल्हा परिषद वाशिम



जल जिवन मिशन अंतर्गत
आयेजीत जिल्हास्तरीय वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा,
सकाळी ११ वाजता
आयोजक :
वाशिम

देशोन्नती

# जलजीवन मिशन स्पर्धेत जिल्ह्यातील मुलींची बाजी

- मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्याहस्ते बक्षीस वितरण
- प्राविण्य प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक



देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ▪ जि.प. पाणी व स्वच्छता मिशन विभागाकडून १२ मार्च रोजी जीवन मिशन अंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमासाठी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्याहस्ते बक्षीस वितरण समारंभ झाला. या जलजीवन मिशनच्या विविध स्पर्धेत जिल्ह्यातील मुलींनी बाजी मारली. या कार्यक्रमासाठी जि.प. प्रकल्प संचालक जलजीवन मिशन जगदीश साहू यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम महालक्ष्मी सेलिब्रेशन लॉन लाखाला येथे दुपारी २ वा.संपन्न झाला.

जल जीवन मिशनेची जनजागृतीसाठी केंद्र शासन आणि राज्य शासनच्या मार्गदर्शनात जि.प. व्यावतीने जिल्ह्यातील संपूर्ण शाळेमध्ये निबंध व चित्रकला, वक्तृत्व स्पर्धाचे आयोजन केले होते. स्पर्धेमध्ये प्राविण्य प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले. जिल्ह्यामध्ये सहा तालुक्यांमध्ये तालुकास्तरीय स्पर्धा होती. आणि तालुकास्तरावरून प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाचे विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये सहभागी झाले होते. यामध्ये निबंध स्पर्धा प्राथमिक गटामध्ये वेदांती देशमुख शिवाजी हायस्कूल रिसोड, प्रणव कोल्हे जि.प. शाळा कंकरवाडी प्रथम क्रमांक, शिवम दुबे नाना मुंदडा विद्यालय मालेगाव, सोमेश सुडके जि.प. शाळा पोटी द्वितीय क्रमांक, सलोनी राठोड जि.प.शाळा गव्हा तिसरा क्रमांक, माध्यमिक गट निबंध स्पर्धेमध्ये समृद्धी दीक्षित जि.प. माध्यमिक विद्यालय मंगरूळपीर, सिद्धीका परांडे एल देशमुख विद्यालय कारखेडा प्रथम क्रमांक, श्रेयश लेवे ब्लूचिप कॉन्व्हेंट कारंजा, कृष्णाली हाडे एल एस पी एम हायस्कूल मानोरा द्वितीय क्रमांक, समीक्षा मोळे, निकिता मनवर तृतीय क्रमांक, जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेमध्ये प्राथमिक गटात आरदा आखूड जि.प.शाळा मानोरा, सार्थक कव्हर जि.प.शाळा तामसी प्रथम क्रमांक, अनन्या शेजव जि.प. शाळा वापटी कुद्दी, प्राथमिक गजानन कव्हर जि.प. शाळा तामसी यांना द्वितीय क्रमांक, पुनम झुंगारे जि.प. शाळा बोरखेडी, सोहम गायकवाड बालविकास मंदिर शाळा मालेगाव तृतीय क्रमांक, चित्रकला स्पर्धा माध्यमिक गटमध्ये भूमिका ठक्कर बाकलीवाल विद्यालय वाशिम रिना जिचकर भगवंतराव विद्यालय गिरोली प्रथम क्रमांक, रुनल रवी राव जेसी हायस्कूल कारंजा सिद्धी लांडे नाना मुंदडा विद्यालय मालेगाव द्वितीय क्रमांक, समृद्धी मुंडे जेसी हायस्कूल कारंजा सक्षम धम्म प्रकाश गायकवाड तृतीय क्रमांक, वक्तृत्व स्पर्धेमध्ये ज्युनिअर गटामध्ये स्वराली वाणी जेसी ज्युनियर कॉलेज कारंजा प्रथम क्रमांक, सानिया ढोके विद्याभारती ज्युनियर कॉलेज कारंजा द्वितीय क्रमांक, श्रद्धा गंजे व्ही एन कॉलेज मंगरूळपीर तृतीय क्रमांक, वरिष्ठ गटामध्ये वैदिका वाळक वाय सी महाविद्यालय मंगरूळपीर प्रथम क्रमांक, राधिका दंडे आरे कॉलेज वाशिम द्वितीय क्रमांक, दिव्या गोल्हारे पुष्पा देवी सीनियर कॉलेज रिसोड तृतीय क्रमांक, लघुपट निर्मिती स्पर्धेमध्ये श्रेयश पसारकर केकत उमरा प्रथम क्रमांक, निलेश खंडारे वीट भट्टी जवळ शेलू रोड द्वितीय क्रमांक, रामदास वनगर सिविल लाईन वाशिम निशा काळे वाशिम तृतीय क्रमांक, विविध स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी जगदीश साहू प्रकल्प संचालक जल जीवन मिशन यांच्या नेतृत्वात पुष्पलता अफुने कार्यक्रम प्रमुख व जिल्हा पाणी स्वच्छता मिशन कक्षाच्या चमूने प्रयत्न केला. (का.प्र.)

## जल जीवन मिशनच्या जागृतीसाठी विविध स्पर्धा

विविध स्पर्धेमध्ये जल जीवन मिशन योजनेला यशस्वी करण्यासाठी लोकसहभाग वाढावा सदर योजना ही लोकाभिमुख व्हावी याकरिता विद्यार्थी अवस्थेतच पाण्याचे महत्व कळावे आणि आपल्या सवंगडी तसेच परिवारातील सदस्यांना ते समजावून सांगता यावे, याकरिता विविध अंगांनी स्पर्धा घेण्यात आल्या. या माध्यमातून जल जागृतीसाठी 'जलदूत, जलमित्र' निर्माण व्हावे या हेतूने स्पर्धा घेण्यात आल्या.

Washim Edition

देशोन्नती

# जीवन पाण्याशिवाय अपूर्ण असल्याने पाण्याचे महत्व जाणणे काळाची गरज - सीईओ वाघमारे

## तालुक्यातील प्रतिभावंतांना जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे पुरस्कार वाटप

देशोन्नती वृत्तसंकलन...



**मानोरा** ▪ तालुक्यातील कारखेडा येथे असलेल्या कै. के. एल. देशमुख माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थिनींचा सत्कार त्यांच्या पालकांसमवेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी उपस्थितांनाना मार्गदर्शन करून त्यांच्या हस्ते निबंध पुरस्कार वितरण करण्यात आले.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जि.प. वाशिम यांचेकडून जलजीवाण मिशन अंतर्गत आयोजित जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये कारखेडा येथील कु. सिद्धीका गजानन परांडे व कु. रसिका बालचंद आडे यांनी मानोरा तालुक्यातील प्रथम व द्वितीय पुरस्कार पटकावून जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत सहभागी होण्याची पात्रता मिळवली होती. जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत कु. रश्मी का परांडे यांनी जलजीवन मिशनद्वारा आयोजित उपरोक्त स्पर्धेमध्ये जिल्ह्यातून पहिला येण्याचा मान मिळवला आहे.

निसर्ग व जीवसृष्टीसाठी गरजेचे असलेले पाणी आपण तयार करू शकत नसल्यामुळे नैऋत्य मोसमी वाऱ्याकडून आपणास मिळत असलेले मोजके पाणी नियोजन करून व्यवस्थित वापरल्यास मानवी जीवन आणि निसर्गाचे संतुलन राखण्यास आपण यशस्वी होऊ असा दृढ विश्वास व्यक्त केला.

कै.के.एल. देशमुख विद्यालयाच्या माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी कु.सिद्धीका हिने जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम पुरस्कार पटकावल्या बद्दल तिचे, तिच्या पालकाचे व शाळेतील मुख्याध्यापकाचे सामूहिक सत्कार मुख्य कार्यपालन अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाभरातील पुरस्कार प्राप्त विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक आणि ग्रा. पं. पदाधिकारी, कर्मचारी, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष व जलजीवन मिशनचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. (ता.प्र.)

लोकमत

# 'जलजीवन'च्या स्पर्धेत मुलींची बाजी

## बक्षीस वितरण समारंभ : निबंध, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनच्या वतीने जलजीवन मिशनअंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे निकाल जाहीर झाले असून, यामध्ये मुलींनी बाजी मारली. जिल्हास्तरीय बक्षीस वितरण समारंभ १२ मार्चला जिल्हा परिषदेत पार पडला.

जलजीवन मिशन योजनेला यशस्वी करण्यासाठी लोकसहभाग वाढावा, योजना लोकाभिमुख व्हावी याकरिता विद्यार्थिदशेतच पाण्याचे महत्त्व कळावे म्हणून जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यातील शाळांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. तालुकास्तरावरून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे विद्यार्थी जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी झाले होते. विविध गटांत स्पर्धा घेऊन प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाच्या विद्यार्थ्याला प्रत्येकी अनुक्रमे २१ हजार रुपये, ११ हजार व ५५०० रुपयांचे बक्षीस मिळाले. जलजीवन मिशनच्या जागृतीसाठी चलचित्र माध्यमातून लघुपट निर्मिती स्पर्धासुद्धा घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये प्रथम ३१ हजार रुपये, द्वितीय २१ हजार तर तृतीय बक्षीस ११ हजार रुपये होते. जिल्हास्तरीय बक्षीस वितरण समारंभाला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे, जलजीवन मिशनचे प्रकल्प संचालक जगदीश साहू यांची प्रमुख उपस्थिती होती. विविध स्पर्धांच्या यशस्वितेसाठी प्रकल्प संचालक जगदीश साहू यांच्या नेतृत्वात कार्यक्रम प्रमुख पुष्पलता अफुने व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या चमूने परिश्रम घेतले.

### हे ठरले विजेते...

- निबंध स्पर्धेत प्राथमिक गटात वेदांती देशमुख व प्रणव कोल्हे प्रथम, शिवम दुबे व सोमेश सुडके द्वितीय, सलोनी राठोड हिला तृतीय क्रमांक मिळाला तर माध्यमिक गटात समृद्धी दीक्षित व सिद्धिका परांडे प्रथम, श्रेयस लेव्हे व कृष्णाली हाडे द्वितीय तर समीक्षा भोळे, निकिता मनवर यांना तृतीय क्रमांक मिळाला.
- चित्रकला स्पर्धेत प्राथमिक गटात शारदा अखंड व सार्थक कव्हर यांना प्रथम, अनन्या शेजव व प्रथमेश कव्हर यांना द्वितीय तर पुनम झुंगारे व सोहम गायकवाड यांना तृतिय क्रमांक मिळाला. माध्यमिक गटात भूमिका ठक्कर व रिना जिचकर यांना प्रथम, रुनल रवीराव व सिद्धी लांडे यांना द्वितीय तर समृद्धी मुंडे व सक्षम गायकवाड यांना तृतिय क्रमांक मिळाला.
- वक्तृत्व स्पर्धेत ज्युनिअर गटात स्वराली वाणी प्रथम, सानिया ढोके द्वितीय तर श्रद्धा गंजे हीला तृतिय क्रमांक मिळाला. सिनिअर गटात वेदिका वाळके प्रथम, राधिका दंडे द्वितीय तर अश्विनी वानखडे हीला तृतिय क्रमांक मिळाला.
- लघुपट निर्मिती स्पर्धेत श्रेयश पसारकर प्रथम, निलेश खंडारे द्वितीय क्रमांक, तर नेहा काळे यांना तृतीय क्रमांक मिळाला.
- विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांना मान्यवरांच्याहस्ते बक्षीस देऊन सन्मानीत करुन त्यांचे कौतुक करण्यात आले.